क्र.आस्था २ (४)/इएसटी/आयसीसी/२०१७–१८/७

परिपत्रक :–

विद्यापीठातर्फे कार्यान्वित असलेल्या वैद्यकीय गटविमा योजना

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, स्थानापन्न संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना खालीलप्रमाणे कळविण्यात येते:–

१. आपणास विदीत आहेच की, विद्यापीठातील सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी २०१४–१५ सालापासून न्यू इंडिया ॲश्युरन्स कंपनीमार्फत वैद्यकीय गटविमा योजना कार्यान्वित करण्यात आली. आजवर (२०१६–१७ पर्यंत) या योजनेअंतर्गत लाभार्थी कर्मचारी संख्या व एकूण दावा केलेली रक्कम, इन्शुरन्स कंपनीला भरलेला प्रिमियम (कर धरून) आणि विद्यापीठाने प्रिमियमची दिलेली रक्कम याचा तक्ता खालीलप्रमाणे आहे :–

| वर्ष | इन्शुरन्स कंपनीचा प्रिमियम अधिक कर | विद्यापीठाने अदा केलेली रक्कम | कर्मचाऱ्यांच्या दाव्याची एकूण रक्कम | लाभ घेतलेले कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| सन २०१४–१५ | रू.६०,१२,१५९/– | रू.६०,१२,१५९/– | रू.५४,०४,४०७/– | १२३ |
| सन २०१५–१६ | रू.९३,४७,०००/– | रू.९३,४७,०००/– | रू.१,६५,०३७३९/– | २०० |
| सन २०१६–१७ | रू.१,२५,००,०००/– | रू.९४,००,०००/– | रू.१,८९,००,०००/– | ३०० |
| सन २०१७–१८ | रू.१,५६,३५,०००/– (प्रस्तावित) | रू.१,०६,००,०००/– (प्रस्तावित) | –– | –– |

२. सन २०१७–१८ याकरिता (ऑगस्ट महिन्यातील ज्या दिवशी इन्शुरन्स कंपनी विद्यापीठातर्फे प्रिमियमची जी रक्कम अदा केली जाईल त्या दिवसापासून एक वर्ष पूर्ण होईपर्यंत) इन्शुरन्स कंपनीने रू.१,३२,५०,०००/– इतकी मूळ रक्कम अधिक १८ टक्के जीएसटी अशी एकूण रू.१,५६,३५,०००/– इतक्या रकमेची मागणी केली आहे. यातील १८ टक्के जीएसटीचा भार विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सोसावा लागू नये म्हणून गेल्या वर्षी विद्यापीठाने अदा केलेली एकूण रू.९४.०० लाख ही रक्कम (ज्यात कदापी वाढ होणार नाही या शर्तीच्या अधीन राहून) वाढवून त्यात १२ लाख रूपयांची भर घालून एकूण रू. १,०६,००,०००/– रूपये देऊ केलेले आहेत. उर्वरित रू.५०,३५,०००/– इतकी हप्त्याची रक्कम विद्यापीठातील एकूण १,२१६ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून दरमहा रूपये ३५०/– वजा करून उभी करावी असा प्रस्ताव मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघटनेच्यावतीने विद्यापीठ प्रशासनास देण्यात आला आहे.

तथापी, सदर बाब दिनांक ३० जुलै, २०१७ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने त्यांच्या शिफारशींसह जेव्हा व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ च्या बैठकीत ठेवण्यात आली, तेव्हा त्यानुसार असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील काही शिक्षकेत्तर कर्मचारी सदर मेडिक्लेम योजनेचा लाभ घेऊ इच्छित नाहीत त्यानुसार सद्यस्थितीत असलेल्या १२१६ कर्मचाऱ्यांची संख्या कमी होईल. म्हणून विमा हप्ता व त्यामधून विद्यापीठाने देऊ केलेली रक्कम वजा जाता उर्वरित रकमेमध्ये जी कर्मचाऱ्याच्या वेतनातून प्रतिमहा कपात करावयाची आहे, त्यात बदल होईल. त्याकरिता इच्छूक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून संमती पत्र घेण्यात यावे.

३. या परिपत्रकाद्वारे सर्व शिक्षकेत्तर सहकाऱ्यांना असे कळविण्यात येत आहे की, ज्यांना उपरोक्त वैद्यकीय गटविमा योजना स्विकारावयाची असेल अशाच कर्मचाऱ्यांनी या परिपत्रकाबरोबर जोडलेले वैयक्तिक होकार (संमती पत्र) लेखी स्वरूपात दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ च्या संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत उपकुलसचिव, आस्थापना २ व ४, यांच्याकडे सादर करावे.

विद्यापीठातील सर्व विभागाचे संचालक, विभागप्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, स्थानापन्न संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख, यांनी सदर बाब संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावी.

कुलसचिव

मुंबई—४०००३२
८ ऑगस्ट, २०१७

क्र.आस्था(२/४)/इएसटी/आयसीसी/२०१७—१८/६     ८ ऑगस्ट, २०१७

प्रति,

विद्यापीठातील सर्व विभागाचे संचालक/विभाग प्रमुख,
सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल,
स्थानापन्न संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी,
सर्व उपकुलसचिव, स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख

(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:—

१. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव,
२. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल (वित्त व लेखा विभाग)
३. स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ मुद्रणालय
४. विद्यापीठ अभियंते (फोर्ट परिसर व विद्यानगरी परिसर)
५. सर्व सहायक कुलसचिव/सहायक कुलसचिव (वित्त व लेखा)
६. सुरक्षा अधिकारी
७. सर्व सहायक सुरक्षा अधिकारी
८. कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख
९. उद्यान अधीक्षक/अधीक्षक (तांत्रिक), विधी विभाग
१०. स्वीय सहायक (१) कुलगुरु (२) कुलसचिव, (३) स्थानापन्न संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, (४) स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी, (५) संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित:—

१. अध्यक्ष, मुंबई युनिवर्सिटी ऑफिसर्स वेल्फेअर असोसिएशन (मुनोवा)

# मुंबई विद्यापीठ

## संमतीपत्र

कर्मचाऱ्याचे नाव :—
पदनाम :—
विभागाचे नाव :—
कर्मचारी सांकेतांक क :—
दिनांक

प्रति,
उपकुलसचिव,
आस्थापना विभाग २ व ४
मुंबई विद्यापीठ,
फोर्ट,
मुंबई ४०० ०३२

महोदय,

मी, श्री/श्रीमती..................................परिपत्रक क.......................
दिनांक ................. च्या अनुषंगाने कळवू इच्छितो/ इच्छिते की, मुंबई विद्यापीठाने सुरू केलेली “वैद्यकिय गटविमा योजनेच्या” लाभाची मला व माझ्या कुटुंबियांना आवश्कता असून मी या योजनेचा लाभ घेण्यास इच्छूक आहे. तरी कृपया याची नोंद घ्यावी.

आपला/आपली विश्वासू

( )

मुंबई. ४०० ०३२

दिनांक